# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २७/०५/२०२४ (सोमवार) दुपार**

---

### उपविभागीय पोलीस अधिकारी नागपुर विभाग नागपुर ग्रामीण यांची जुगार खेळणाऱ्यावर धडक कार्यवाही

दि. २६/०५/२०२४ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी नागपुर विभाग नागपुर ग्रामीण यांचे पथका कडुन अवैद्य जुगार खेळणारे लोकांवर कार्यवाही करण्यात आली असुन सदर कार्यवाही मध्ये एकूण १४,४८,५६०/— रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला.

गोपनिय बातमीदारद्वारे खात्रीलायक खबर मिळालेवरून उपविभागीय पोलीस अधिकारी नागपुर विभाग नागपुर ग्रामीण यांनी पो.स्टे. बुट्टीबोरी हद्दीतील मौजा खरसोली शिवारात ताशपत्त्यावर जुगार खेळणाऱ्या लोकांवर लपत छपत घेराव करून छापा कार्यवाही केली. सदर कारवाई मध्ये १) सोहल नवाब अन्सारी वय ३५ वर्ष रा. हजारी रोड लाल स्कुल जवळ मोमीनपुरा नागपुर ता. जि. नागपुर २) रूपेश छत्रपती गिरंपुजे वय २४ वर्ष, रा. एस टिडे पो मागेराम नगर वर्धा ३) सेवक रमेश चौधरी वय २६ वर्ष, रा. जुनी मंगळवारी भुजाडे मोहल्ला हत्ती नाला नागपुर ता. जि. नागपुर ४) रोशन प्रभाकर पानबुडे वय २८ वर्ष रा. गाडगेबाबा नगर, रमना मारोती नागपुर ता. जि. नागपुर ५) यश आनंद पडोळे वय २४ वर्ष रा. प्लाट नंबर २८ दुसरा स्टाप गोपाल नगर नागपुर ६) गजानन विश्वनाथ पाटील वय ६३ वर्ष रा. प्लाट क्र. २८ बौध्द विहार जवळ नरेन्द्र नगर नागपुर ७) संतोष विनायक वेलतुलकर वय ४८ वर्ष रा. जुनी मंगळवारी पिन्टु सावजी धाबा जवळ नागपुर ८) सलाउद्दीन वल्द गॅसुददीन वय ४८ वर्ष रा. मोमीनपुरा दर्गा नागपुर ता. जि. नागपुर ९) रूपेश निर्मल सोलिया वय ३४ वर्ष रा. टिमकी बाजार नागपुर १०) आकाश दिलीप ईगळे, वय २८ वर्ष, रा. गोपाल नगर पाहिला बसस्टाप नागपुर ११) प्रणय सुजीत गायकवाड वय २५ वर्ष रा. सावित्रीबाई नगर मानेवाडा नगर नागपुर १२) रवी वामन मोहीते वय ३४ वर्ष रा. खरबी चौक शेष नगर नागपुर ता. जि. नागपुर १३) अर्जुन शंभु राणा वय २५ वर्ष रा. मानव शक्ती ले आउट बाहादुरा नागपुर १४) योगल यशवंतराव पटले वय २६ वर्ष रा. मानव शक्ती ले आउट बाहादुरा नागपुर १५) रोहीत सुनील ठाकरे वय ३२ वर्ष रा. शिवन गाव पुनवर्सन चिचभवण नागपुर १६) सुनिल दादु बिनेस वय २५ वर्ष रा. रेणुका माता नगर प्लाट नंबर ४८ नागपुर १७) अनिल भैय्याजी राउत वय ४५ वर्ष, रा. न्युबिडी पेठ धांडे किराणा जवळ नागपुर यांचे अंगझडती मध्ये नगदी २,३४,५१०/— रू ५२ ताश पत्ते, १४ ॲड्राईड मोबाईल फोन किंमती १,००,०००/— रू तसेच जुगार खेळणेकरीता घटणास्थळावरील वाहण ०१ चारचाकी कार व १२ दुचाकी वाहण किं. ११,१०,०००/— रू चा असुन, असा एकुण किमंती १४,४८,५६०/—रू. चा मुददेमाल मिळून आला. तसेच सदर जुगार हा सोनु उर्फ ऐल्या मेश्राम नावाचा इसम भरवत असल्याचे निष्पन्न झाल्याने एकुण १८ आरोपीतांविरूध्द कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायदा सहकलम १०९ भादवी प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर जुगाराची माहिती मा. श्रीमती पुजा गायकवाड उपविभागीय पोलीस अधिकारी नागपुर विभाग नागपुर ग्रामिण यांना मिळताच त्यांनी मिळालेल्या माहीतीची गोपनियता पाळून उपविभाग नागपुर अंतर्गत असलेल्या पोलीस स्टेशन एम आय डि सी बोरी, बुट्टीबोरी येथील अधिकारी व कर्मचारी याचे विशेष पथक तयार करून सापळा रचुन छापा कारवाई करण्यात आली.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्रीमती पूजा बा. गायकवाड उपविभागीय पोलीस अधिकारी, नागपूर विभाग, नागपूर ग्रामीण यांचे नेतृत्वात पोउपनी जगदिश पालीवाल, पोहवा प्रविण देव्हारे, पोहवा अरून कावळे, पोहवा जयसिंगपुरे, पोना रोशन बावणे, पोशि गौरव मोकडे, पोशि पांडुरंग मुडे, पोशि गजानन पंचबुधे, पोशि विशाल यांनी केली.



## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

दिनांक २६/०५/२०२४ वेळ ०९/४६ वा. दरम्यान पोस्टे केळवद येथील स्टाफ पोस्टे परीसरात सरकारी वाहनाने पेट्रोलींग करीत असता मुखबिरव्दारे खबर मिळाली कि, पांढुर्णा ते नागपुर हायवे रोडने अशोक लेलॅन्ड गाडी क्र. एम एच– २०/ई एल–०३४८ मध्ये अवैधरित्या कत्तलीकरीता गौवंश जनावरांची वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या खबरे वरून बिहाडा फाटा येथे नाकाबंदी केली असता पांढुर्णा (एम पी) कडुन एक अशोक लेलॅन्ड गाडी क्र. एम एच–२०/ई एल– ०३४८ ही भरधाव वेगाने नागपुरकडे नाकाबंदीचे ठिकाणी येतांना दिसली, त्याला पोलिस स्टॉफसह नाकाबंदीचे ठिकाणी थांबवण्याचा इशारा केला असता सदर वाहन चालकाने त्याचे वाहन नाकाबंदीचे ठिकाणी न थांबवता नागपुरच्या दिशेने पळुन गेला तेव्हा स्टाफने त्याचा पाठलाग करून त्याची गाडी थांबवीली असता सदर वाहनाचे वाहन चालक **आरोपी नामे– १) गुरपिंदरसिंग परमजितसिंग चंदेड, वय २७ वर्ष रा. बुडडाजी नगर नवीन वस्ती टेकानाका नागपुर C/o स्वर्णसिंग तरळ यांचे घरी किरायाने २) अभय चंदनलाल यादव वय ३२ वर्ष रा. माजरी ०२ नं. नाका नागपुर** यांनी आपल्या ताब्यातील वाहनामध्ये १) ०२ नग पांढऱ्या रंगाचे कालवड गौवंश किंमत २०,०००/– रू २) ०३ नग पांढ–या रंगाची गाय गौवंश किंमत ६०,०००/– रू ३) ०३ नग भु–या रंगाची गाय गौवंश किंमती ६०,०००/–रू. ४) ०१ नग काळया रंगाची गाय किंमती २०,०००/–रू. ५) ०१ नग कोस्या रंगाची गाय किंमती २०,०००/–रू. असा एकुन १,८०,०००/– रू चे गोवंश जनावरे यांना अत्यंत कुर व निर्दयतेने वाहनात डांबुन आखुड दोरीने पाय व तोंड बांधुन चारा पाण्याची सोय न करता दाटीवटीने अपु–या जागेत कोंबुन असल्याचे दिसले. आरोपींच्या ताब्यातून अशोक लेलॅड गाडी क्र. एम एच–२०/ई एल– ०३४८ किंमती १०,००,०००/–रू. व १,८०,०००/– रू. चे गोवंश जनावरे असा एकुण ११,८०,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जप्त करण्यात आलेल्या गौवंश जनावरांना पुढील देखभाल व उपचाराकरीता जय श्री कृष्ण गौशाळा गोंडेगाव ता. नरखेड येथे दाखल करण्यात आले आहे. फिर्यादीचे लेखी रिपोर्टवरून पोलिस स्टेशन केळवद येथे आरोपीतांविरूद्ध

कलम ४२९, २७९, ३४ भादंवि सहकलम ११ (१) (घ) (ड) (च) प्राण्यांना निर्दयतेने वागवणे प्रति. अधिनियम १९६० सहकलम ५ (अ) ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधि. १९९५ सहकलम ११९ म.पो.का सहकलम १८४, ३/१८१ मो.वा. का. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. अनिल म्हस्के, उपविभागीय पोलिस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोलिस स्टेशन केळवद राकेश साखकर, पोहवा दिनेश काकडे, पोहवा सुधीर यादगिरे, नापोशि होमेश्वर खडसे, पोशि धोडुतात्या देवकते, पोशि सचिन सलामे यांनी केली. पुढील तपास पोहवा दिनेश काकडे हे करत आहेत.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक २६/०५/२०२४ रोजी पोस्टे केळवद येथील स्टाफ पोस्टे परीसरात सरकारी वाहनाने पेट्रोलींग करीत असता मुखबिरव्दारे खबर मिळाली कि, छिंदवाडा ते नागपुर रोड ने झायलो गाडी क्र. एम एच –०४/जी डी–१९७२ मध्ये अवैधरित्या कत्तलीकरीता गौवंश जनावरांची वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या खबरे वरून जैतगढ़ शिवारातील आर टी ओ बॅरेल येथे पोहचुन नाकाबंदी करीत असतांना छिंदवाडा (एम पी) कडुन एक झायलो गाडी एम एच –०४/जी डी–१९७२ हे नाकाबंदीचे ठिकाणी येताना दिसली. त्याला पोलिस स्टाफ सह नाकाबंदीचे ठिकाणी थांबवण्याचा इशारा केला असता झायलो गाडी एम एच –०४/जी डी–१९७२ चे चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन नाकाबंदीचे ठिकाणी न थांबवता नागपुरच्या दिशेने २०० मिटरवर जाउन रोडच्या बाजुला आपले वाहन उभे केले व पोलिस स्टॉफ त्या ठिकाणी जाईपर्यंत सदर वाहन चालक हा जंगली झाडीझुडपाचा फायदा घेउन पळुन गेला.

सदर झायलो गाडी क्र. एम एच –०४/जी डी–१९७२ किंमती ५,००,०००/–रू. ची पाहणी केली असता त्यामध्ये कोणीही व्यक्ती मिळुन आली नाही. सदर झायलो क्र. एम एच –०४/जी डी–१९७२ चे दार उघडुन मागील बाजुस पाहणी केली असता त्या मध्ये १) ०२ नग लाल रंगाचे जर्सी गाईचे कालवड गौवंश किंमती २०,०००/–रू. २) ०२ नग काळया पांढ–या रंगाची जर्सी गाय किंमती ४०,०००/–रू. ३) ०२ नग लाल रंगाची जर्सी गाय किंमती ४०,०००/–रू. ४) ०१ नग कोस्या रंगाची जर्सी गाय किंमती २०,०००/–रू ५) एक पांढ–या रंगाची गाय किमंत १५०००/– रू असे एकून १,३५,०००/–. रू चे गोवंश जनावरे यांना अत्यंत कुर व निर्दयतेने वाहनात डांबुन आखुड दोरीने पाय व तोंड बांधुन चारा पाण्याची सोय न करता दाटीवाटीने अपु–या जागेत कोंबुन वाहतुक करीत असल्याचे मिळुन आल्याने आरोपींच्या ताब्यातून १,३५,०००/–. रू चे गोवंश जनावरे व झायलो गाडी क्र. एम एच –०४/जी डी–१९७२ किंमती ५,००,०००/–रू. असा एकुण ६,३५,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जप्त करण्यात आलेल्या गोवंश जनावरांना पुढील देखभाल व उपचाराकरीता शेठ रामलाल मालु गौशाळा कवठा ता. सावनेर येथे दाखल करण्यात आले आहे.

फिर्यादीचे लेखी रिपोर्टवरून पोलिस स्टेशन केळवद येथे कलम २७९ भादंवि सह कलम ११ (१) (घ) (ड) (च) प्राण्यांना निर्दयतेने वागवणे प्रति अधिनियम १९६० सहकलम ५ (अ) ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधि १९९५ सहकलम ११९ मपोका सहकलम १८४ मो.वा.का प्रमाने गुन्हा नोंद करण्यात येत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. अनिल म्हस्के, उपविभागीय पोलिस अधिकारी सावनेर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली मा. राकेश साखकर ठाणेदार पोलिस स्टेशन केळवद, पोहवा दिनेश काकडे, पोहवा सुधीर यादगिरे, नापोशि होमेश्वर खडसे पोशि धोंडुतात्या देवकते, पोशि सचिन सलामे यांनी केली. पुढील तपास पोहवा दिनेश काकडे हे करत आहेत.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर